आश्रमशाळा शिक्षकांचीही सुटका नाही; टीईटीविना कायमची सुटी

बीड : सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) अनिवार्य आहे. त्याच पार्श्वभूमीवर राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या अनुदानित आश्रम शाळांमधील शिक्षकांनाही आगामी दोन वर्षात टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक केले आहे.

जिल्ह्यातील जवळपास दोन हजारपेक्षा जास्त शिक्षकांवर याचा परिणाम हाणार आहे. त्यांना आता टीईटी उत्तीर्ण व्हावेच लागणार आहे. या संदर्भात शासनाने जारी केलेल्या आदेशाची तातडीने व काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश आदिवासी विकास विभागाने सर्व प्रकल्प अधिकारी, सहायक आयुक्त, अपर आयुक्तांना दिले आहेत.

अन्यथा नोकरीवर गंडांतर येणार

आश्रम शाळेतील इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या संबंधित शिक्षकांना दोन वर्षात टीईटी उत्तीर्ण व्हावे लागणार आहे. अन्यथा त्यांच्या नोकरीवर गंडांतर येऊ शकते.

दोन वर्षात टीईटी पास करावी लागणार !

आदिवासी विकास विभागाच्या निर्णयानुसार आरटीई कायदा लागू होण्यापूर्वी नियुक्त झालेले आणि सेवानिवृत्तीस पाच वर्षपेक्षा अधिक कालावधी शिल्लक असलेल्या शिक्षकांना दोन वर्षाच्या आत टीईटी उत्तीर्ण करणे अनिवार्य केले आहे. अन्यथा त्यांना सेवेत राहता येणार नसल्याचे या निर्णयात म्हटले आहे.

कोणत्या शिक्षकांसाठी बंधनकारक

सर्व शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रम शाळा, केंद्रीय आश्रम शाळा, एकलव्य निवासी, आश्रम शाळेतील टीईटीविना नियुक्त शिक्षकांना हा निर्णय बंधनकारक आहे.

४८ आश्रम शाळांतील ३०० शिक्षकांची सत्वपरीक्षा

जिल्ह्यात ४८ आश्रमशाळा आहेत, तर २,७०० इतकी आस्थापना आहे. समजलेल्या माहिती नुसार टीईटी उत्तीर्ण शिक्षकांची संख्या ५०० पेक्षा जास्त नाही. त्यामुळे दोन हजारापेक्षा जास्त शिक्षक, मुख्याध्यापकांची आता सत्वपरीक्षा आहे.

...त्यांची मात्र कचाट्यातून सुटका

(पान २ वर)

सत्यम ऑप्टिकल वॉच लँड

सादर आहे भव्य धमाका ऑफर

सर्व प्रकारचे ब्रँडेड नंबर चे चष्मे, स्लु कट, एंडहान्स डिजिटल प्रोग्रेसिव्ह लेन्स , सर्व कंपनी च्या गॉगल व घड्याळी वर मिळवा ५०० पर्यंत दणदणीत सुट

Titan, Fastrack, Timex, Helix Etc

Rayban, Fossil, Police, Idee Etc

15% AUGUST FREEDOM SALE UP TO 50% OFF

सत्यम ऑप्टिकल अँड वॉच लँड

9822347771

सेल... सेल.... सेल....

भारतीय स्वतंत्रता दिवस निमित्त ५०% पर्यंत दणदणीत सुट
• Titan • Fastrack, • Sonata • Police, • Tommy • Timex • Helix • Tmx • janta • Rubees • Sundae • Frank Bella • Maxima • Pebble etc

तसेच
• Rayban • Oakley • Police • Fossil • cK • Lacoste • Fila • iara • idee • irus • velocity Crizal • Zeiss • Kodak etc

भारतातील सर्व नामांकित कंपनी चे माहेर घर त्वरा करा.. आज च भेट द्या ! आपले हक्काचे दुकान

15 AUGUST INDEPENDENCE DAY Sale UP TO 50% OFF

Satyam Opticals

On All Brands

biG SALE INDEPENDENCE DAY Upto 50% OFF COUPON CODE : SALE LIMITED TIME ONLY

Satyam Optical & Watch Land

Ray-Ban OAKLEY TITAN POLICE FOSSIL Fastrack ZEISS IDEE GUESS Crizal CK LACOSTE

सत्यम ऑप्टिकल अँड वॉच लँड

योगेश्वरी मंदिरा जवळ, अंबाजोगाई, ९८२२३४७७७१

• कृपया या योजने ची माहिती आपल्या सर्व ग्रुप्स आणि मित्र नातेवाईक यांना फॉरवर्ड करा •

- जाहिर प्रगटन -

वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

मा.श्रीमती प्रियंका जे.लिगाडे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर.अंबाजोगाई यांचे न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२६/२०२६
रामकिसन विरुद्ध निरंक

अर्जदार :– १) रामकिसन पि.सोपानराव गर्जे, वय–५७ वर्षे, धंदा–शेती, २) केशव पि.सोपानराव गर्जे, वय–५३ वर्षे, धंदा–शेती, ३) ज्ञानोबा पि.सोपानराव गर्जे, वय–४५ वर्षे, धंदा–शेती, सर्व रा.अंबलवाडी ता.अंबाजोगाई जि.बीड, ४) प्रभावती भ्र.रतन केंद्रे, वय–५२ वर्षे, धंदा–घरकाम, रा.उमराई, ता.अंबाजोगाई जि.बीड.

विरुद्ध

निरंक

अर्जदार क्र. १ ते ४ चे वडील मयत नामे **सोपान पि.लिंबाजी गर्जे** हे दिनांक ११/०४/२०१९ रोजी मयत झाले आहेत. यांच्या मृत्यू पश्चात कायदेशीर वारस म्हणुन अर्जदारास शासकीय व निमशासकीय कारणासाठी ते मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

त्यांच्या सदरहू अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखे पासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेख्यावरच असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर कोर्ट सदरहू अर्जदार हयांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाणपत्र देईल.

पुढील तारीख : – २३/०२/२०२६.

आज दिनांक : – १५/०१/२०२६ रोजी न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरीत/– कनिष्ठ लिपीक, सह.दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, अंबाजोगाई जि.बीड

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून स्वाक्षरीत/– सहा. अधीक्षक, सह.दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, अंबाजोगाई जि.बीड

-जाहिरनामा-

वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

श्रीमती ए.एम.डबळे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश
कनिष्ठ स्तर. अंबाजोगाई यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३९/२०२६
आशाबाई वगैरे विरुद्ध निरंक

ज्यापेक्षा नामे **यमुना राम शिरेकर**, रा. शेपवाडी, ता. अंबाजोगाई जि.बीड, हे दि. १७/०३/२०२० रोजी मयत झाले आहेत.

अर्जदार – १) आशाबाई भ्र.दत्तात्रय कैलासे, वय–५७ वर्षे, धंदा–घरकाम, रा.जुजगर गल्ली, माजलगाव, ता.माजलगाव जि.बीड, २) अरुणाबाई भारत रांजणकर, वय–५६ वर्षे, धंदा–घरकाम, रा.गिरवली (बावणे), ता.अंबाजोगाई जि.बीड, ३) सविता भारत शिंदे, वय–४६ वर्षे, धंदा–घरकाम, रा.गोपीनाथ तावरे चाळ, दर्गा रोड, दुधवाडी हाशियान हॉटेल जवळ, नवगण कॉलनी, ४) गणेश धनाजी शिरेकर, वय–२८ वर्षे, धंदा–शिक्षण, [illegible] फाटा, दत्तनगर, पेरणे ता.हवेली जि.पुणे.

विरुद्ध

निरंक

ज्यापेक्षा नामे यमुना राम शिरेकर, रा.शेपवाडी, ता.अंबाजोगाई जि.बीड, हे दिनांक १७/०३/२०२० रोजी मयत झाले आहेत. मयत नामे यमुना राम शिरेकर यांचे वारसांना **शासकीय व निमशासकीय कामाकरिता** वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी मा.न्यायालयात हा अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहु अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी हया न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरच असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर न्यायालय सदरहु अर्जदार यांच्या हक्काबद्दल लाललीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसाचे प्रमाणपत्र अर्जदार व गैरअर्जनार यांना देण्यात येईल.

पुढील तारीख १८/०२/२०२६.

आज दिनांक :– १५ माहे ०१ सन २०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिला.

स्वाक्षरित/– कनिष्ठ लिपीक ३ रे सह दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर अंबाजोगाई जि.बीड

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून स्वाक्षरीत/– सहाय्यक अधीक्षक ३ रे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर अंबाजोगाई जि.बीड.

order Dt. 12/03/2026
Seen/ Filed
Digitally signed by PRIYANKA JAYAPRAKASH LIGADE Date: 2026.03.13 09:36:25 +0530
2nd Jt. C. & J.D.Ambajogai

अपघातात जखमी झालेल्या देवीनिमगाव येथील तरुणाचा १९ दिवसांनंतर उपचारा दरम्यान मृत्यू

कडा : आठवडी बाजारासाठी दुचाकीवर जाताना धामणगावकडे जाणाऱ्या परधाव चारचाकीने धडक देऊन५०० मीटर अंतरावर फरपटत नेल्याने तरुण गंभीर जखमी झाला. त्याच्यावर अहिल्यानगर येथील एका रुग्णालयात उपचार सुरु असताना अखेर १९ दिवसांनंतर गुरुवारी पहाटे त्याचा मृत्यू झाला.

आष्टी तालुक्यातील देवीनिमगाव येथील आदित्य शहाजी पानखडे २० हा तरुण २८ डिसेंबरला दुपारी दुचाकी घेऊन कडा येथील आठवडा बाजारला जात होता. याच वेळी कडयावरुन धामणगांवकडे जाणाऱ्या एम.एच.२३, बी.सी.३७३७ या चारचाकी वाहनाने त्याला जोराची धडक दिली. या अपघातात तो तरुण गंभीर जखमी झाला होता. अहिल्यानगर येथील एका खासगी रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरु होते. १९ दिवसांनंतर उपचारा दरम्यान गुरुवार दि.१५ जानेवारी २०२६ रोजी पहाटे त्याचा मृत्यू झाला. त्याच्या पार्थिवावर शोककुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात आई, वडील, दोन बहिणी, असा परिवार आहे. सध्या महाराष्ट्रातील सर्व रस्ते सिमेंटचे झालेले आहेत, हे रस्ते अतिशय चकचकीत व गुळगुळीत झालेले आहेत. कोणत्याही वाहनावर वेग मर्यादेचे स्पीड लॉक नसल्याने अनेक वाहने भरधाव वेगात जात असल्याने अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. गुळगुळीत रस्त्यावर वाहन धारकांचे नियंत्रण राहत नसल्याने अपघाताला चालना मिळत आहे. महाराष्ट्रात व देशात दरवर्षी रस्ते अपघातात मृत्यू पावणाऱ्यांची संख्या चिंताजनक आहे.

- जाहिर प्रगटन -

वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

मा.श्रीमती प्रियंका जे.लिगाडे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर.अंबाजोगाई यांचे न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२९/२०२५
सुकन्या विरुद्ध निरंक

अर्जदार :– १) सुकन्या भ्र.शालिगअप्पा व्यवहारे, वय–६२ वर्षे, धंदा–घरकाम, २) योगेश पि.शालिगअप्पा व्यवहारे, वय–३६ वर्षे, धंदा–नौकरी, दोघे रा.खडकपुरा गल्ली, अंबाजोगाई जि.बीड, ३) मिनाक्षी भ्र.वसंतराव राउत, वय–६० वर्षे, धंदा–घरकाम, रा.सारस्वत कॉलनी, अंबाजोगाई, ता.अंबाजोगाई जि.बीड, ४) स्नेहल भ्र. संजय होनखांबे, वय–५३ वर्षे, धंदा–घरकाम, रा.९२७/४. फुले प्लॉट उपळाई रोड के.व्ही.नगर बार्शी, जि.सोलापूर.

विरुद्ध

निरंक

अर्जदार क्र. १ चे सासरे व अर्जदार नं. २ चे आजोबा आणि अर्जदार क्र. ३ व ४ यांचे वडील मयत नामे गुरुसिध्दअप्पा पि. बंडाप्पा व्यवहारे हे दिनांक २२/०९/२०१३ रोजी मयत झाले आहेत. यांच्या मृत्यू पश्चात कायदेशीर वारस म्हणुन अर्जदारास शासकीय व निमशासकीय कारणासाठी ते मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

त्यांच्या सदरहू अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखे पासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेख्यावरच असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर कोर्ट सदरहू अर्जदार हयांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाणपत्र देईल.

पुढील तारीख : – २५/०२/२०२६.

आज दिनांक : – १५/०१/२०२६ रोजी न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरीत/– कनिष्ठ लिपीक, सह.दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, अंबाजोगाई जि.बीड

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून स्वाक्षरीत/– सहा. अधीक्षक, सह.दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, अंबाजोगाई जि.बीड

नायलॉन मांजाने पोलिस पाटलांचे तोंड कापले, पडले ७ टाके

अनिल धीवर

वैजापूर : बेलगाव पोलिस पाटील अनिल धीवर हे दुचाकीने जात असताना नायलॉन मांजाने त्यांचे तोंड कापले गेले. त्यांच्या दोन्ही गालांना सात टाके पडले आहेत. बुधवारी (दि. १४) रात्री साडे आठ वाजेच्या सुमारास वैजापूर शहरात ही घटना घडली.

धीवर हे दुचाकीवर वैजापूर शहरातून रात्री साडेआठच्या सुमारास लाडगाव रस्त्याने आपल्या गावी बेलगाव येथे जात होते. दुचाकी चालत असतानाच अचानक त्यांच्या तोंडाला नायलॉन मांजा अडकल्याने ओठांच्या दोन्ही बाजूंनी गालांवर मोठी जखम झाली. यानंतर नागरिकांनी त्यांना तात्काळ खासगी रुग्णालयात दाखल केले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

दै.अंबाजोगाई टाईम्स Date : 17/01/2026

- CHANGE IN NAME -

I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME

OLD NAME - HEMLATA DIGAMBARRAO KULKARNI

TO CHANGE MY

NEW NAME - VASUDHA SHAMRAO KULKARNI

MO. : 9158035901.

PRESENT ADDRESS - C/O. S.P.KULKARNI 'ABHIRUCHI' Raja Bansilal Nagar, Behind Dama Hospital, AMBAJOGAI, DIST.BEED.(MAHARASHTRA)

* संस्थापक : कै. ईश्वरचंद्रजी भिकुलाल गुप्ता * E-mail: umeshgupta7288@gmail.com, ambatimes1@gmail.com,*RNI No.-39816/79, , * हे पत्र मुद्रक, प्रकाशक, श्री.उमेश ईश्वरचंद्र गुप्ता यांनी हे सांय.दैनिक अंबाजोगाई टाइम्स, कविता प्रिंटर्स, मुकुंदराज हौसिंग कॉलनी, ८/२४, कृष्णा निवास, अंबाजोगाई, जि.बीड, (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून कविता प्रिंटर्स मुकुंदराज हौसिंग कॉलनी, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड येथे प्रकाशित केले. * संपादक- उमेश ईश्वरचंद्र गुप्ता मो. 9422242585, 7620050337, पोस्टल परवाना – No.L.SB/BEED/RNP-204/2024-2026.